राज्य अन्न आयोग,मुंबई

# तांत्रिक निविदा

**राज्य अन्न आयोग,** अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, १ ला मजला, ठाकरसी हाऊस, जे.एन.हरदीयामार्ग, विदेश टपाल कार्यालया जवळ, बॅलार्ड ईस्टेट, मुंबई-४००००१ मोबाईल क्र. ९९६७४५५९३४ दूरध्वनी क्र.०२२-२०८२०८९२ या कार्यालयास मासिक दरावर चतुर्थ श्रेणी (शिपाई) कर्मचा-याच्या एक वर्षाच्या सेवेची आवश्यकता आहे. चतुर्थ श्रेणी कर्मचारी (शिपाई) पुरविण्याबाबत मुनष्यबळ पुरवठाधारक संस्थाकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत. त्यासंबंधीच्या संस्थेस लागू असलेल्या अटी व शर्ती पुढील प्रमाणे :-

**निविदाकाराने तांत्रिक निविदा मधील सर्व माहिती भरणे आवश्यक आहे अन्यथा निविदा रद्द करण्यात येईल.**

| | |
|---|---|
| १ | उद्योग व उर्जा विभागाच्या शासन निर्णय क्र.भांखस२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४ दि.१/१२/२०१६ आणि त्यासोबत संलग्न सुधारीत नियमपुस्तीका यामध्ये विविध नियमांतर्गत तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. |
| २ | आस्थापने व दुकाने अधिनियमानुसार नोंदणी केलेल्या परवान्याची प्रत सादर करावी. |
| ३ | निविदेच्या अंतिम तारखे पर्यंत ग्राह्य असलेले आयकर भरल्यासंबंधीच्या प्रमाणपत्राची प्रत तसेच मागील ३ वर्षाची आयकर विवरणपत्रे व पॅनकार्ड ची प्रत सोबत जोडणे आवश्यक राहील. |
| ४ | निविदाकाराचे नाव काळया यादीत नसल्याचे व निविदेतील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र रुपये १००/- चे बॉन्ड पेपरवर स्वप्रमाणित करणे आवश्यक आहे. |
| ५ | जी एस टी प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडावी वर नमूद केलेल्या आवश्यक कागदपत्रांमध्ये शासनास आवश्यक वाटल्यास अधिक कागदपत्रांची तसेच मूळ कागदपत्रांची मागणी करण्यात येईल व निविदाकारास मागणीनुसार ती कागदपत्रे पडताळणी करीता दाखविणे बंधनकारक राहील. |
| ६ | मागील ३ वर्षाची संस्थेची उलाढाल (TURNOVER) कागद पत्रे सादर करावीत. |
| ७ | शासनाला मनुष्यबळ पुरविण्यासाठीचा संस्थेकडे असलेला अनुभव याची कागद पत्रे सादर करावीत. |
| ८ | मागील ३ वर्षाच्या कालावधीत संस्थेने ज्या कार्यालयांसाठी मनुष्यबळाचा पुरवठा केला आहे त्या कार्यालयांचा पत्ता व सविस्तर तपशील सादर करावा. |
| ९ | या कार्यालयाचा पत्ता :- **राज्य अन्न आयोग,** अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, १ ला मजला, ठाकरसी हाऊस, जे.एन.हरदीयामार्ग, विदेश टपाल कार्यालया जवळ, बॅलार्ड ईस्टेट, मुंबई-४००००१ मोबाईल क्र. ९९६७४५५९३४ दूरध्वनी क्र.०२२-२०८२०८९२ |

**महाराष्ट्र शासन**

राज्य अन्न आयोग

अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,

१ ला मजला, ठाकरसी हाऊस, जे.एन.हरदीया मार्ग,विदेश टपाल कार्यालया जवळ,बॅलार्ड ईस्टेट,मुंबई-४००००१ या कार्यालयास मासिक दरावर चतुर्थ श्रेणी (शिपाई) कर्मचा-याच्या सेवेची आवश्यकता आहे. त्यानुसार मासिक दरावर करारनामा होण्यापासून पुढील एक वर्षाच्या कालावधी करीता **एक** चतुर्थ श्रेणी कर्मचारी (शिपाई) पुरविण्याबाबत मनुष्यबळ पुरवठा धारक संस्थाकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत. त्याच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे-

| अ.क्र. | **चतुर्थश्रेणी कर्मचारी यांच्यासाठी अटी व शर्ती** |
|---|---|
| १ | उमेदवार भारतीय नागरीक असावा तसेच त्याची शैक्षणीक अर्हता किमान चौथी पास असावी. त्यास मराठी लिहीता, वाचता बोलता येणे आवश्यक आहे. |
| २ | उमेदवाराचे वय १८ ते ४० वर्षे या दरम्यान असावे. |
| ३ | उमेदवारा जवळ आधार कार्ड / निवडणूक ओळखपत्र / पॅनकार्ड यापैकी एखादे कार्ड असावे. |
| ४ | संस्थेतर्फे पुरविण्यात येणारे उमेदवार गुन्हेगारी पार्श्वभूमीचे किंवा प्रवृतीचे नसावेत. याबाबतचे स्वयंघोषणापत्र उमेदवाराने तसेच संबंधित संस्थेने दाखल करणे आवश्यक राहील. |
| ५ | दुर्देवाने शिपायास गंभीर स्वरुपाची इजा झाल्यास वैद्यकीय खर्चाचे अथवा नुकसान भरपाईचे कोणतेही दायित्व शासनाकडे राहणार नाही त्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील. |
| ६ | उद्योग,उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ३०/०८/२०१९ च्या अधिसूचनेनुसार निर्धारित केलेल्या वेतनदराप्रमाणे वेतन वेळोवेळी लागू असलेले कर व अनुज्ञेय भत्यांची फी अदायगी करणे संस्थेस बंधनकारक राहील. उपलब्ध करुन दिलेल्या मनुष्यबळाला देय असलेल्या कायदेशिर आर्थिक दायित्व वेतनात अंतर्भूत असून संबंधित प्राधिकरणाकडे कायदेशीर दायित्व जमा करण्याची जबाबदारी संस्थेची राहील. मागणीनुसार याबाबतची कागदपत्रे वेळोवेळी राज्य अन्न आयोग, कार्यालयाकडे जमाकरणे संस्थेवर बंधनकारक राहील. याबाबत राज्य अन्न आयोग कार्यालयाकडे कोणतेही दायित्व राहणार नाही. |
| ७ | मागणी केलेल्या कालावधीसाठी शिपाई उपलब्ध होवू शकत नसेल अशावेळी संस्थेमार्फत पर्यायी व्यवस्था मान्य अटींसह करण्यात यावी अन्यथा दंडात्मक शुल्क आकारण्यात येईल. |
| ८ | प्रत्येक दिवसाच्या कामकाजाचा कालावधी ८.३० तास राहील. यासाठी संबंधित उमेदवाराने त्याची कार्यालयात येण्याची व कार्यालय सोडण्याची वेळ याबाबत राज्य अन्न आयोग, मुंबई कार्यालयाच्या आस्थापना शाखेत ठेवण्यात येणा-या नोंदवहीत करणे आवश्यक राहील. |
| ९ | दरपत्रकामध्ये अदा करावच्या मासिक ठोक रक्कमेचा दर नमूद करावा. |
| १० | मनुष्यबळाच्या सेवा पुरविण्याबाबत रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर शासनाशी एक वर्षाचा करार करणे आवश्यक राहील. सदर करार संपुष्टात आणणे अथवा त्यास आवश्यकतेनुरुप मुदतवाढ देणे याबाबतचा निर्णय या कार्यालयाचा राहील. कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार विशिष्ट कालावधीसाठी उमेदवाराची मागणी केली जाईल. |
| ११ | शासकीय नियमानुसार सुटया अनुज्ञेय असतील. तसेच आवश्यकता असल्यास सुटीच्या दिवशीही कामावर यावे लागेल. |

**महाराष्ट्र शासन**
राज्य अन्न आयोग
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
१ ला मजला, ठाकरसी हाऊस, जे.एन.हरदीयामार्ग, विदेश टपाल कार्यालया जवळ,
बॅलार्ड ईस्टेट, मुंबई-४००००१ मोबाईल क्र.९९६७४५५९३४ दुरध्वनी क्र.०२२-२०८२०८९२
ई-मेल : rajyaannaayog@gmail.com

क्र.राअआ-२०२३/शिपाई भरती निविदा/प्र.क्र. ५३/ दिनांक :१५/०९/२०२३

ई - निविदा सुचना

राज्य अन्न आयोग, मुंबई या कार्यालयात मासिक दरावर शिपाई पदासाठी सेवेची आवश्यकता आहे. त्यानुसार मासिक दरावर निविदेतील अटी शर्तीनुसार करारनामा झाल्यापासून एक वर्षाच्या कालावधी करीता शिपाई पुरविण्याबाबत निविदा धारकांकडून निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | बाब | तपशिल |
|---|---|---|
| १ | मासिक दरावर शिपाई पुरविणे | शिपायांना वेतनाचा मासिक ठोक दर नमूद करावा. शिपायांच्या दिवसाचा कामकाजाचा कालावधी ८.३० तास इतका राहील. |
| | | सेवा शुल्क रुपये (मासिक) (इतर कायदेशीर आर्थिक दायित्व जसे की भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी विमा, सेवा कर इत्यादी ) सेवा पुरवठादार संस्थेची राहील. |

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा कालावधी | शासनाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द झाल्यापासून दिनांक ०४/१०/२०२३ रोजी दुपारी ५.०० वाजे पर्यंत या कार्यालयात निविदा अटी व शर्तीनुसार सादर करण्यात याव्यात. |
| २ | निविदा उघडण्याची तारीख व ठिकाण | दिनांक ०५/१०/२०२३ रोजी दुपारी ३.१५ वाजता या कार्यालयात उघडण्यात येतील. |

निविदे संदर्भातील अटी,शर्ती यांची तपशिलवार माहिती पुढीलप्रमाणे आहे.

१. निविदाधारक किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी निविदा उघडण्याच्या वेळी सर्व माहितीसह हजर राहू शकतील.

२. निविदेतील अटी, शर्ती याबाबत व निविदा स्विकारणे अथवा नाकरण्याचा हक्क शासनाने राखून ठेवला आहे.

३. शासनाने निविदा स्विकृत केलेल्या निविदाधारकांस निविदेतील मनुष्यबळाची मागणी विभागाच्या गरजेनुसार व निकडीनुसार करेल. पुरवठा केलेले मनुष्यबळ योग्य दर्जाचे नसल्याचे विभागाच्या निदर्शनास आल्यास, सदर दरकरार कोणतेही कारण न देता रद्द करण्यात येईल.

४. निविदेतील दर हे निविदा स्विकृती नंतर एक वर्षासाठी अस्वित्वात राहतील. सदर दर एक वर्ष किंवा पुढील दर करार होईपर्यंत कायम राहीतील. सदर करार केव्हाही संपुष्टात आणण्याचे अथवा त्यास मुदतवाढ देण्याचे अधिकार शासनास राहतील.

५. नियमित स्वरुपातील मनुष्यबळ उपलब्ध होताच त्या दिवसापासून निविदाधारकाबरोबर केलेला दरकरार संपुष्टात येईल.

६. निविदाकारांनी मागणनुसार मूळ कागदपत्रे तपासणीसाठी सादर न केल्यास अथवा अपूर्ण सादर केल्याचे आढळल्यास निविदा प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.

सचिव
राज्य अन्न आयोग

सचिव
राज्य अन्न आयोग